क्र.मनपा/सभा/२/विशे/ ०२ /२०१६-२०१७
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ३० / ०१ /२०१७

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका विशेष सभा क्रमांक - ०२ /२०१६-२०१७

महानगरपालिका विशेष सभेची नोटीस

प्रति,
मा. _____
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ड) (ह) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची विशेष सभा **शनिवार दि.०४/०२/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता** पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय सांगली येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

30.1.2017
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मा.राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण (WZ) बेंच पूणे यांनी महापालिका विरुद्ध सांगली जिल्हा सुधार समिती ॲप्लीकेशन नं.११५/२०१४ मध्ये दि.२९/१२/२०१६ रोजी दिलेला निर्णय व त्या निर्णयान्वये महापालिकेने करावयाच्या उपाययोजना व कार्यवाही बाबत अवलोकनार्थ आलेले **उपायुक्त मुख्यालय यांचे दि.३०/०१/२०१७ चे विषयपत्र**

२. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे अंमलबजावणी करीता मा.स्थायी समिती ठराव क्र.२०८ दि.०९/१२/२०१६ अन्वये निविदा दराने सेवाशुल्क देणेस व अंतिम DPR मा.महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेस शिफारस केलेनुसार सदर DPR ला मान्यता मिळणेस व सदर DPR ला नगरविकास मंत्रालयाकडे सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना किंवा स्वच्छ महाराष्ट्र अभियान किंवा स्वच्छ भारत मिशन योजनेतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाकडील इतर प्राप्त योजनेतर्गत अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२१/११/२०१६ चे विषयपत्र.**

३. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी एकूण ३२५९ प्रकरणे मंजूर असून, २१६७ वैयक्तीक शौचालय बांधून पूर्ण आहेत. तसेच, एकूण ४००० प्रकरणे मंजूर होतील असा अंदाज असल्याने, एकूण रु.२कोटी आवश्यक आहेत. त्यापैकी रु.१,५९,००,०००/- मात्र वर्ग केलेली आहे. त्यामुळे उर्वरित र.४१ लक्ष वर्ग करणे आवश्यक असलेने, सदरचा निधी १४ व्या वित्त आयोगातून विनीयोग करणेस तसेच अंतिम मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२५/०१/२०१७ चे विषयपत्र.**

४. महानगरपालिकेकडे सद्या कार्यरत असलेले संपकालीन,बदली,मानधन कर्मचारी यांना किमान वेतन कायद्यांतर्गत किमान वेतन दर निर्धारीत करुन त्या दरानुसार वेतन आदा करणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.३०/०१/२०१७ चे विषयपत्र.**

५. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सन्मा.सदस्यांच्या सूचना विचारात घेवून, चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणे.

30.1.2017
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

विशेष महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०२/२०१७

ठराव क्रमांक :- ५४६

विषय क्रमांक :- ०१

सोबतचे उपायुक्त मुख्यालय यांचे दि.३०/०१/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण (WZ) बेंच पूणे यांनी महापालिका विरुद्ध सांगली जिल्हा सुधार समिती ॲप्लीकेशन नं.११५/२०१४ मध्ये दि.२९/१२/२०१६ रोजी दिलेला निर्णय व त्या निर्णयान्वये महापालिकेने करावयाच्या उपाययोजना व कार्यवाही बाबत अवलोकनार्थ आलेले आहे. तथापि, मा.हरित न्यायालयाने दिलेला निकाल व सभागृहातील उपस्थित सदस्यांच्या व्यक्त केलेल्या भावना विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणामध्ये अक्षम्य दिरंगाई झालेचे दिसून येत आहे. त्यामध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी आयुक्त यांनी करावी व त्यांचा अहवाल सभागृहापुढे सादर करावा. श्री.सुनिल पवार, उपायुक्त मुख्यालय यांनी प्रस्तुत प्रकरणी चांगल्या प्रकारे पाठपुरावा केल्याने, मे.हरित न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने एक चांगला निर्णय दिला. त्याबाबत ही सभा श्री.सुनिल पवार यांचे अभिनंदन करीत आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणात मा.महापौर यांचे अधिकारात सर्वपक्षीय सदस्यांची कमिटी स्थापन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सबब, प्रस्तुतचे विषयपत्र अवलोकनी घेवून ही सभा परत पाठवित आहे.

सूचक

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

आरोग्याधिकारी

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

विशेष महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०२/२०१७

ठराव क्रमांक :- १४७

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२९/११/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे अंमलबजावणी करीता मा.स्थायी समिती ठराव क्र.२०८ दि.०९/१२/२०१६ अन्वये निविदा दराने सेवाशुल्क देणेस व अंतिम DPR मा.महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेस शिफारस केलेनुसार सदर DPR ला मान्यता मिळणेस व सदर DPR हा नगरविकास मंत्रालयाकडे सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना किंवा स्वच्छ महाराष्ट्र अभियान किंवा स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाकडील इतर प्राप्त योजनेंतर्गत अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्तुतचे विषयपत्र सादर करणेत आलेले आहे. त्याबाबत सभागृहामध्ये इको सेव्ह कंपनीकडून DPR बाबतची संपूर्ण प्रक्रिया व त्यासाठी येणारा खर्च याबाबतचे सादरीकरण केले. त्यावर सभागृहात सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्या विचारात घेता, सर्व सदस्यांना DPR ची प्रत देणे व त्यावर अभ्यासासाठी वेळ देणे अभिप्रेत आहे. तरी प्रशासनाकडून सर्व सदस्यांना DPR ची प्रत पोहोच करावी व सर्व सदस्यांना त्यावर अभ्यास करणेसाठी वेळ देणेत येत असून, पुढील मिटींग पर्यंत प्रस्तुत विषय हा सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर :-

आरोग्याधिकारी

महानगरपालिका सचिव,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

[illegible] दिनांक :- ०४/०२/२०१७

ठराव क्रमांक :- १४८

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२५/०१/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महाराष्ट्र स्वच्छता अभियान अंतर्गत सप्तपदी, हरित स्वच्छ महाराष्ट्रासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविणेत येत आहे. त्यानुसार महानगरपालिकेने सप्तपदी संकल्पामध्ये तिसरे पाऊल १००% शौचालयाचा वापर करणेसाठी प्रवृत्त करणेचे धोरण निश्चित केले असून, राज्यातील शहरामधील उघड्यावर शौच करण्याची प्रथा बंद करुन शहरे हागणदारी मुक्त करणेसाठी महापालिकेमार्फत मिशन मोड पद्धतीने महापालिका क्षेत्रातील ज्या नागरीकांकडे वैयक्तीक शौचालय उपलब्ध नाहीत अशा नागरीकांना उक्त अभियानांतर्गत शौचालय बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाचे अनुदान उपलब्ध करुन देणेत येत आहे.

त्यानुसार महासभा ठराव क्र.११४ दि.०२/०१/२०१५ अन्वये वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी मनपा हिस्सा रु.२०००/- मात्र प्रति लाभार्थी यांना देणेस तसेच, सन २०११ च्या जनगणनेनुसार मनपा हद्दीमध्ये उघड्यावर बसणाऱ्या कुटुंबाची संख्या ७९१५ असून, त्यासाठी रु.१,५९,९०,०००/- मात्र इतका मनपा हिस्स्याची रक्कम वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्यासाठी विनियोग करण्यास मान्यता देणेत आलेली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) तसेच, स्वच्छ सर्वेक्षण २०१७ बाबत महापालिकेमध्ये आयोजित दि.२४/१२/२०१६ रोजीचे कार्यशाळेत मा.महापौरसो यांनी रु.५०००/- प्रमाणे प्रति लाभार्थी मनपाचा हिस्सा देणेचे जाहिर केलेनुसार सदर योजनेंतर्गत वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी एकूण ३२५९ प्रकरणे मंजूर असून, २१६७ वैयक्तीक शौचालय बांधून पूर्ण आहेत. तसेच, एकूण ४००० प्रकरणे मंजूर होतील असा अंदाज असल्याने, एकूण रु.२कोटी आवश्यक आहेत. त्यापैकी रु.१,५९,००,०००/- मात्र वर्ग केलेली आहे. त्यामुळे उर्वरित रु.४१ लक्ष वर्ग करणे आवश्यक असलेने, सदरचा निधी १४ व्या वित्त आयोगातून विनीयोग करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

आरोग्याधिकारी,

सूचक

महापालिका सचिव,
श्री मिरज कुपवाड महानगरपालिका

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

विशेष महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०२/२०१७

ठराव क्रमांक :- १४९

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.३०/०१/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.२४ फेब्रुवारी २०१५ च्या शासन राजपत्रातील अधिसूचनेस अनुसरुन महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था या अनुसूचित रोजगाराच्या वर्गवारीतील कामगारांना देय असलेले किमान वेतन दराबाबत निश्चिती करणेत आलेली आहे. त्यामध्ये कुशल कर्मचारी यांना रु.१४,०००/-, अर्धकुशल कर्मचाऱ्यांना रु.१३,०००/- आणि अकुशल कर्मचाऱ्यांना रु.११,५००/- मात्र या प्रमाणे किमान वेतन निश्चित करणेत आलेले आहे. त्याच बरोबर कामगार आयुक्त कार्यालय,मुंबई यांचे दि.०६ ऑगस्ट २०१५ अन्वये किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत अनुसूचित उद्योगातील कामगारांना विशेष भत्ता म्हणून महापालिकेकरीता रु.२२४०/- प्रति महिना सर्व कर्मचाऱ्यांकरीता निश्चित करणेत आलेला आहे.

उक्त विषयांकीत कामी आर.सी.एच.फेज -२ कार्यक्रमांतर्गत कार्यरत कर्मचारी यांना किमान वेतन लागू करणेबाबतचे निवेदन सभागृहात वाचून दाखविणेत आले. त्यामध्ये काही कर्मचाऱ्यांचे वेतन (मानधन) हे किमान वेतन दरापेक्षा जादा असलेचे दिसून आले आहे. असे एकूण ११ कर्मचारी आहेत. त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी ०८, प्रोग्राम मॅनेजर ०१, अकौन्टट ०१ व डाटा इन्ट्री ऑपरेटर ०१ अशा ११ पदांचा समावेश आहे. ते आत्तापर्यत करीत असलेली सेवा व सद्याची महागाई विचारात घेता व जरी ते किमान वेतनापेक्षा जादा मानधन घेत असले तरी,त्यांचे मानधनात वाढ करणे इष्ट होईल असे या सभेचे मत आहे. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी प्रत्येकी रु.८०००/-, प्रोग्राम मॅनेजर रु.७०००/-, अकौन्टट रु.५०००/- व डाटा इन्ट्री ऑपरेटर रु. ४०००/- प्रमाणे मासिक मानधनात वाढ करणेस ही सभा मान्यता देत असून, जे कर्मचारी सद्या किमान वेतन दरापेक्षा कमी मानधन घेत आहेत. अशांना वरील प्रमाणे किमान वेतन व विशेष भत्ता लागू करणेस ही सभा मान्यता देत आहे. मात्र, बदली व मानधन कामगारांचे बाबत गेल्या तीन महिन्यातील सलग हजेरी विचारात घेवून, कर्मचारी संख्या आरोग्य विभागाने निश्चित करुन तशी यादी त्यांनी आस्थापना विभागाकडे सादर करणेची आहे. तसेच, अन्य विभागाकडे काम करीत असलेले सर्व बदली व मानधन कर्मचाऱ्यांचाही सहा महिने किंवा त्याहून अधिक काळ गैरहजर बदली व मानधन कर्मचाऱ्यांचा समावेश करणेत येवू नये असे ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त शासन राजपत्रातील अधिसूचनेमध्ये कुशल,अर्धकुशल व अकुशल कामगारांची व्याख्या नमुद करणेत आलेली आहे. त्यान्वये प्रशासनाकडून कुशल,अर्धकुशल व अकुशल कामगारांची वर्गवारीसह प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. तथापि, सदरची वर्गवारी ही प्रशासनाने जिल्हा उद्योग भवन सांगली येथे कार्यरत असलेल्या सहा.कामगार आयुक्त कार्यालयाकडून प्रमाणीत करुन घेवून, त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

वरिलप्रमाणे महानगरपालिकेकडे सद्या कार्यरत असलेले संपकालीन,बदली,मानधन कर्मचारी यांना किमान वेतन कायद्यांतर्गत किमान वेतन दर निर्धारीत करुन त्या दरानुसार वेतन व विशेष भत्ता दि.०१/०४/२०१७ पासून आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. मात्र, त्यासाठी विषयपत्रानुसार मासिक रु.९० लाख पर्यत जादा बोजा अपेक्षित आहे. परंतु, तो मासिक रु.एक कोटीपर्यत अपेक्षीत आहे. तो भरुन काढणेसाठी एल.बी.टी. अनुदानाबरोबरच या वाढीव बोजा करीताचे अनुदान मा.शासनाकडून प्राप्त होणेसाठी आवश्यक तो प्रस्ताव प्रशासनाकडून मा.शासनाकडे सादर करणेत यावा.

शासन अधि. (आस्था.)
H/mon

सूचक

ठराव सर्वानुमते मंजूर

पालिका सचिव,
कुपवाड महानगरपालिका

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

विशेष महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- ०४/०२/२०१७

ठराव क्रमांक :- ५५०

विषय क्रमांक :- ०५

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांच्या सूचना विचारात घेवून, चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणेकामी सभागृहामध्ये सांगोपांग चर्चा झाली. चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित सदस्यांनी आपल्या सुचना खालीलप्रमाणे सूचित केल्या

अ) श्री.गौतम संभाजी पवार -

१. सुजलाम सुफलाम योजना :-

शहरीकरणास सक्षम होण्यासाठी महापालिकेस स्वत:चे उत्पन्न हवे. काळानुरुप उत्पन्नाचे आणि व्यवसायाचे मार्ग बदलत आहेत. आज साऱ्या विश्वाला प्रचंड विजेची गरज आहे आणि म्हणून अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा विकास होत आहे. पैकी सौर ऊर्जा व पवन ऊर्जा हे यशस्वी ऊर्जा साधने आहेत.

आज अनेक गावे विजेविना आहेत. अनेक उद्योगांना वीज लागते. त्यामुळे प्रचंड मागणी असणारा हा उद्योग आहे. विजनिर्मितीतून महापालिकेला उत्पन्न प्राप्त करु शकते. महाराष्ट्र सरकारने नविन विज धोरण लागू केले आहे. जेणेकरुन, विज निर्मिती केलेस ती स्वत: वापरुन विकू शकतो. थेट लाभार्थिस विज देवू शकतो अथवा राज्य शासन हिच विज विकत घेवू शकते. यासाठी राज्य शासन पि.पि.ए.अर्थात पॉवर परचेस ॲग्रिमेंट करत योग्य दर निश्चितीने विज विकत घेण्याची शासन जबाबदारी घेते. त्यामुळे महापालिकेने प्रस्ताव दिल्यास शासनास विविध पर्यायाने विचार करता येईल. वार्षिक अनुदान वाढविण्याऐवजी विज खरेदी दर हा उच्च किंमतीने ठरविल्यास पि.पि.ए.सर्वोत्तम दराने होणे शक्य आहे. माजोनल रटवर आपण पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मॉडेलवर ० ते १०% गुंतवणूकीत प्रकल्प उभा करु शकू. कर्ज व अनुदीत उत्पन्नातून स्वमालकीचाही अधिक किफायतशीर प्रकल्प शक्य आहे. एकवेळ गुंतवणूकीत किमान ३० वर्षे उत्पन्न देणारा हा उद्योग आहे.

२. आरोग्यवर्धिनी योजना

अद्ययावत हॉस्पिटल होय. आपल्या महापालिकेकडे खूपशा जागा आहेत. जसे आपले प्रसुतीगृह, एकेकाळी जिल्ह्यासाठी सुविधा असणारे प्रसुतीगृह आज वादाच्या भोवऱ्यात आहे. या जागेचा सद् उपयोग करुन अद्यावत हॉस्पिटल जसे की, बॉम्बे हॉस्पिटल,जसलोक हॉस्पिटल,३०० बेडचे हॉस्पिटल सुसज्ज व अत्याधुनिक केले तर, पुण्याच्या दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल नंतर सांगलीचे आरोग्य केंद्र ठरेल व रत्नागिरी कोकण ते बेळगाव पासून सोलापूर पर्यंत रुग्णांसाठी सोय होईल. कोटीची जरी गुंतवणूक टप्याटप्याने गृहीत धरली तरी महापालिकेस खूप मोठा व्यवसाय मिळेल. तसेच, हजार एक रोजगार व फ्लोटींग पॉप्युलेशन मिळेल. जेणेकरुन व्यवसायांना चालना मिळू शकेल.

३. स्वामी विवेकानंद युवा रोजगार योजना

महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्राचे सक्षमीकरण करता येवू शकेल व त्याचे रुपांतर आय.टी.विभागात केल्यास कॉल सेंटरच्या धर्तीवर वेंडरशिप मधून रोजगार व उत्पन्न अपेक्षित धरणे शक्य आहे.

सद्या नागरी सुविधा केंद्रामधून जन्म-मृत्यू सह काही दाखले देण्याचे काम करतो. हा विभाग सक्षम करत काही प्रमाणात टप्याटप्याने काही हार्डवेअर व सॉफ्टवेअर मध्ये गुंतवणूक केल्यास अनेक शहरातील अनेक बेरोजगार तरुणांना पुणे-मुंबई शहराप्रमाणे उत्पन्न देवू शकणारा रोजगार देवू शकू. याच मनुष्यबळाचा व्यावसायिक वापर करुन मोबाईल कंपन्यांची दुरध्वनी माहिती केंद्रे (कॉल सेंटर) सुरु करु शकतो. महापालिका क्षेत्रातील अनेक उद्योगांना या माध्यमातून जगाशी जोडू शकू व संपूर्ण जग त्यांच्यासाठी एका फोन कॉलच्या अंतरावर आणू शकू. अनेक शासकीय कामे ही आऊटसोर्सिंगने केले जातात. या माध्यमातून सद्या खर्च करीत असलेला ८ कोटी रुपयांचा निधी वाचेल व या उद्योगामध्ये टप्याटप्याने ४०० ते ५०० कोटी रुपयांची उलाढाल शक्य आहे. हा उद्योग सेवा उद्योग असल्याने अत्यंत किफायतशीर आहे.

ब) श्री.शेखर विश्वास माने -

१. म्युनिसिपल बॉन्ड सुरु करणे

अल्प उत्पन्न व खर्च ज्यादा अशा नियोजनामुळे मनपाच्या विकासाचा प्रश्न व निधीची कमतरता मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. मनपास प्रत्येक वेळी शासन निधीवर अवलंबून रहावे लागत आहे. शासनाकडून निधी मिळणेस विलंत होत असल्याने मनपा क्षेत्रात सद्या सुरु असलेली विकास कामावर मोठ्या प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता असल्याने, शहर विकासाकरीता म्युनिसिपल बॉन्ड विक्रीस काढून मनपास स्वबळावर शहराचा विकास साधता येईल.

२. मार्केटींग लायसन्सची अंमलबजावणी करुन महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढ अपेक्षित आहे.

. महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढ होणेकामी हार्डशीप योजनेची प्रभावी अंमलबजावणी केलेस मनपा आर्थिक उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे.

४. पे पार्किंगचे जागा भाड्याने व व्हर्टीकल पद्धतीने उभे करणेबाबत मनपचे आर्थिक उत्पन्नात वाढे अपेक्षित आहे.

. OSI यंत्रणा सुरुकरणे मनपाची क्षेत्रात सर्व कर,थकबाकी मोठ्या प्रमाणात थकीत वसुलीबाबत अंमलबजावणी केलेस मनपा आर्थिक उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे.

क) श्री.विष्णू आण्णासाहेब माने -

महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर्सचा सर्व्हे करुन घरपट्टी उत्पन्नात वाढ करणे, ज्या मालमत्तावर अद्यापही मालमत्ता कराची आकारणी झालेली नाही अशा मालमत्तांचा शोध घेवून, त्यांवर मालमत्ता आकारणी करणेत यावी. मालमत्ता विभागाकडील खोकी भाडे सुधारीत करुन उत्पन्नात वाढ करणे.

ड) श्री.शेडजी सुबराव मोहिते -

महानगरपालिका हद्दीमध्ये एम.एस.ई.बी. चे जे पोल आहेत त्या पोलला आकारणी करणेत यावी तसेच, अपार्टमेंटच्या अनाधिकृत बांधकामाची चौकशी केल्यास त्यापासूनही उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे.

ई) श्री.किशोर दादासाो जामदार -

महानगरपालिका मालकीच्या बंद पडलेल्या शाळा व्यावसायिक कारणाकरीता भाड्याने देवून उत्पन्नात वाढ करणे, निवासी हॉस्पिटलवर योग्यती आकारणी करणे, मनपाच्या खुल्या जागा व सर्व इमारतींचा सर्व्हे करणे, क्रिडांगणे तसेच, बंद पडलेले नाके यांचा सर्व्हे करणे, व्यापाऱ्यांना मार्गस्थ फी ची आकारणी केलेस मनपा आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे.

वरील प्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेस अनुसरुन व सदस्यांच्या भावना विचारात घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेचे उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत एल बी टी असून, सद्या एल बी टी बंद झाली असल्यामुळे व महापालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ केल्याशिवाय विकास कामे करणे शक्य नाही. त्याकरीता वर नमुद केलेप्रमाणे उत्पन्ना वाढीसाठी संबंधीत विभागाने आवश्यकती कार्यवाही तात्काळ करुन, त्यासाठी सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पामध्ये तरतुद करणेसाठी योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर.

१) आरोग्याधिकारी (२) शहर अभियंता, (३) प्रशासकीय अधिकारी,
४) करनिर्धारण व संकलन (५) मुख्य लेखापरिक्षक (६) मुख्य लेखाधिकारी,
७) मालमत्ता व्यवस्थापक (८) सहा-संचालक (नगररचना)

महापालिका सचिव,
मोहनी विरज कपूरवार महानगरपालिका